पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक - १०
सभावृत्तांत

दिनांक - ०२/१२/२०१५ वेळ दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि.०२/१२/२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे **“संत ज्ञानेश्वर महाराज”** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. **मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर – सभापती**
२. मा.आल्हाट मंदा उत्तम
३. मा.सुपे आशा रविंद्र
४. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
५. मा.अजित दामोदर गव्हाणे
६. मा.गोफणे अनुराधा देविदास
७. मा.जालिंदर (बाप्पू) शिंदे
८. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
९. मा.श्रध्दा बाजीराव लांडे
१०.मा. Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
११ मा.विश्वनाथ विठोबा लांडे
१२.मा.रसाळ विजय सुदाम - स्विकृत सदस्य
१३.मा.संजय निवृत्ती आहेर – स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.श्री.चंद्रकांत इंदलकर-.प्र.क्षेत्रीय अधिकारी, मा.श्रीनिवास दांगट- प्रशासन अधिकारी, मा.श्री.गायकवाड जीवन -(कार्यकारी अभियंता- स्थापत्य), मा.प्रविण घोडे - (कार्यकारी अभियंता- विद्युत), मा.श्री.व्ही.सी.काळे – उपअभियंता (स्थापत्य), मा.श्री.वाघमारे एस.बी.-उपअभियंता, मा.श्री. मा.कोंडे के.बी.उपअभियंता, (पाणीपुरवठा), मा.मनोज सेठीया – उपअभियंता, (जलनि:सारण), मा.श्री.बोरावके डी.एच. उपअभियंता (स्थापत्य), मा.श्रीम.शिनकर पी.पी.- उपअभियंता नगररचना, मा.व्ही.बी.माने - उपअभियंता नगररचना, मा.जाधव व्ही.के. उपअभियंता (स्था.उद्यान) मा.शेलार ए.पी.क.अभियंता (जलनि:सारण) मा.श्री.ठोकळ संदीप क.अभियंता (जलनि:सारण), मा.श्री.एस.ए.बगली. क.अभियंता, (पाणीपुरवठा), मा.श्री.व्ही.एस.राऊत- क.अभियंता, (पाणीपुरवठा), मा.श्री.कोतकर पी.बी.- क.अभियंता,(पाणीपुरवठा), मा.श्री.इप्पकायल एस.एच.- लेखाधिकारी,मा.श्री.भोकरे आर.डी.- सहा.आरोग्याधिकारी, मा.श्री.एस.बी.बगाडे - सहा.उद्यान अधिक्षक, मा.श्री.बर्डेएस.व्ही.-समाजसेवक, मा.श्री.हनवते पी.एस.- समाजसेवक, मा.राजेश

जगताप- कार्यालयीन अधिक्षक, श्री.नाडेकर बी.के. (स.शि), श्री.शिवाजी विद्यालय, भोसरी, मा.श्री.फुगे एन.जे.- सहा.क्रिडा पर्यवेक्षक

-----

**मा.सभापती-** सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

------

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक- मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक- मा.अनुराधा गोफणे

**मा.सभापती** – कै.माजी आमदार मोतीराम पवार, इ प्रभागाचे स्विकृत सदस्य श्री.प्रकाश सोमवंशी यांच्या पत्नी कै.सविता प्रकाश सोमवंशी, कै.रखमाबाई चिमाजी वाळके, यांचे दु:खद निधनामुळे इ प्रभाग समितीच्या वतीने सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)
सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली

-----

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

**विषय क्रमांक १.** अंदाजपत्रकात कामांचा समावेश करुन तरतूद करणेबाबत.
मा.विश्वनाथ विठोबा लांडे यांचे पत्र.

**विषय क्रमांक २.** स्पर्धा परीक्षा केंद्राच्या रुमबाबत. मा. Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे यांचे पत्र.

----

अ) दिनांक ०४/११/२०१५ रोजी झालेल्या सभेचा(कार्यक्रमपत्रिका ०९) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-------

ठराव क्रमांक- १८ विषय क्रमांक- १
दिनांक- २/१२/२०१५
सूचक- मा. अनुमोदक- मा.
संदर्भ – मा. कार्यकारी अभियंता, स्थापत्य यांचेकडील दिनांक १५/१०/२०१५ चे पत्र.कै. विष्णू सोपान लांडगे उर्फ मालक यांचे नांव इंद्रायणीनगर मधील तिलक रेसिडेन्सी चौकास नाव देण्याबाबत .

विषय क्र. १ चा विचार पुढील सभेच्या वेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक- १९ विषय क्रमांक- २
दिनांक- २/१२/२०१५
सूचक- मा.नितीन काळजे अनुमोदक- मा.अजित गव्हाणे
संदर्भ – मा.नितीन काळजे यांचेकडील पत्र.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, इ क्षेत्रीय कार्यालयाचे हद्दीमधील मौजे च-होली स.नं. ४७० येथील जलक्षेत्र क्र. ७, नवीन उंच पाण्याची टाकी बांधलेली असून ग्रामपंचायत काळातील जुनी पाण्याची टाकी वापरात नसलेने व मोडकळीस आलेने ती पाडणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले**

ठराव क्रमांक- २० विषय क्रमांक- १
दिनांक- २/१२/२०१५
सूचक- मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक-मा.अजित गव्हाणे
संदर्भ- मा. विश्वनाथ लांडे यांचे कडील पत्र.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत येणा-या प्रभाग क्र. ३६ लांडेवाडी मध्ये सन २०१६ -१७ चे अंदाजपत्रकामध्ये खालील कामाचा समावेश करुन पुरेशी तरतुद करणेत यावी व कामे करणेत यावीत. १) नाशिक-पुणे महामार्ग ते लांडेवाडी चौक (अम्फेनॉल कंपनी समोरील) रस्त्याचे दोन्ही बाजूला ऐतिहासिक पध्दतीने सुशोभिकरण करणे. २) लांडेवाडी चौक ते नाशिक-पुणे महामार्गाकडे जाणा-या रस्त्यांचे (टेल्को रोड) सुरुवातीला प्रवेशद्वार (स्वागत कमान) उभारणे व कमानीस धर्मवीर संभाजीराजे प्रवेशद्वार असे नांव देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक-२१ विषय क्रमांक- २
दिनांक- २/१२/२०१५
सूचक- मा. Adv.नितीन लांडगे. अनुमोदक-मा.श्रध्दा लांडे
संदर्भ- मा. Adv.नितीन लांडगे यांचे दिनांक २/१२/२०१५ चे पत्र.

प्रभाग क्र.३५ भोसरी येथे पी.सी.एम.टी.चौकातील मनपाच्या करसंकलन विभागाच्या इमारतीमध्ये दुस-या मजल्यावरील स्पर्धा परीक्षा केंद्र तयार करण्याचे काम चालू आहे. सदर ठिकाणी दुस-या मजल्यावरील अस्तित्वात असलेले शौचालय पाडून त्याच मजल्यावरील पुर्वेकडील खोलीत स्थलांतरीत करण्यात यावे व रिकामी झालेली शौचालयाची जागा स्पर्धा परीक्षा केंद्रासाठी वापरण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर)
सभापती
इ प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - ३९
क्र-इक्षेका/कावि/४/ ७१६/२०१५
दिनांक- २९/१२/२०१५

सही / -
प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)
इ क्षेत्रीय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
भोसरी - ३९

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**दि.२/१२/२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे मासिक सभेत खालीलप्रमाणे मा.नगरसदस्यांनी चर्चा केली.**

**मा.अजित गव्हाणे –** मागचे मिटींगला अतिक्रमण विषयक चर्चा झाली त्याबाबत काय झाले?

**मा.क्षेत्रीय अधिकारी** – भोसरी येथील उड्डाणपूलाखाली जे अतिक्रमण होत आहे त्याकरीता Pay & Park करण्याची फाईल आहे. त्याचे टेंडर झाले आहे. लवकरच तेथे Pay & Park केले जाईल.

**मा.अजित गव्हाणे –** मग नेमकी काय अडचण आहे. प्रत्येक वेळेस विषय होत आहे. मागच्या वेळेस काय बोलले होते. अतिक्रमण पथकाकडून काही काम केले नाही तर मिटींग घेणार नाही.

**मा.चंद्रकांत वाळके -** मागचे वेळेस मिटींग झाली परंतू प्रत्यक्षात काही काम झाले नाही.

**मा.अजित गव्हाणे -** भोसरी येथील उड्डाणपूलाखाली ज्या टप-या, हातगाडया आहेत त्या अधिकृत तरी करा. तेथे अतिक्रमण झपाटयाने वाढत आहे. तुम्ही अतिक्रमण कारवाईबाबत काय करता?

**मा.क्षेत्रीय अधिकारी –** अतिक्रमण विभागाचा मासिक अहवाल या पध्दतीने आहे. १८ टप-या, ३८३ हातगाडया, ११६ वाहतूकीच्या गाडया, ७ वाहने जप्त केले आहे. तसेच ३८,१५०/- दंड केला गेला आहे.

**मा.अजित गव्हाणे –** अधिकृत करण्यासाठी काय करता येईल?

**मा.क्षेत्रीय अधिकारी –** सध्या हॉकर्स झोन निश्चीत करीत आहोत. नॉन हॉकर्समध्ये आलेल्यांवर कारवाई होईल.

**मा.अजित गव्हाणे –** हॉकर्सची पॉलिसी आम्हाला समजून सांगू नका. सरसकट सर्वांना परवानगी दयावी. अतिक्रमणचे काम करण्याची बिलकुल इच्छा नाही कुणाची.

**मा.विश्वनाथ लांडे** - कुठलीच ठिकाणची कारवाई होत नाही. एमआयडीसीची जागा आहे तेथे तर काहीही होत नाही. इंद्रायणीनगरमध्ये काय कंडीशन आहे जरा बघितले पाहिजे.

**मा.संजय आहेर -स्विकृत सदस्य** - इंद्रायणीनगर येथे दुकानांच्या समोर स्टॉल टाकले आहेत. त्यामुळे रहदारीस अडथळा होत आहे. वैष्णवीमाता रस्ता अरुंद झाला आहे.

**मा.अजित गव्हाणे –** लोकांची घरे पाडून रस्ता मोठा केला आहे. लोकांची जाणेयेणेची सोय होणेकरीता. परंतू येथे मात्र त्या रस्त्यावर काय झाले आहे?

**मा.विश्वनाथ लांडे –** अतिक्रमण विभाग कारवाई का करीत नाही. तीन वर्षापासून मी सांगत आहे. तुम्ही काहीच कशी कारवाई करीत नाही. डी.पी.रोड बाबत तुम्ही काय करु नका त्यामुळे तुम्ही काहीच करीत नाही. काम करण्यास मजा येत नाही. तुम्ही नियमात का करीत नाही? तुम्हाला जर काम करण्याची इच्छाच नसेल तर बोलून काय फायदा? तुम्हाला अडचण काय आहे ते तरी सांगा. माझे वॉर्डमध्ये काहीच कामे होत नाही.

**मा.अजित गव्हाणे -** भोसरी येथील उड्डाणपूलाखालील अतिक्रमण बाबत काही तरी करा. किती लोक त्या उड्डाणपूलाखाली बसतात त्याचा तुम्ही सर्व्हे करा. तशी त्यांची यादी तयार करा. स.नं.१ मध्ये मोकळे पटांगण आहे तेथे त्यांना बसण्यासाठी एकएक करुन जागा दया.

भोसरी येथील उड्डाणपूल, आळंदी रोड, मेन रोड यापासून सुरुवात करा. जे लोक तेथे बसतात त्यांना आमचा विरोध नाही. पण ते लोकांना पैसे देतात. त्यापेक्षा महापालिकेला पैसे मिळू दया. पालिकेच्या उत्पन्नात भर पडेल. हे सर्व तुमच्याकडून होणार आहे का? नाही तर बरेचसे नियम होणार आहे. समजा उड्डाणपूलाखाली पन्नास लोक बसतात. हॉकर्स झोनचे नियम काय आहेत? त्यांचेसाठी शासनाने, कायद्याने काही नियम घालून दिले आहेत. तुम्ही जे लोक उड्डाणपूलाखाली बसतात त्यांची यादी तयार करा. किमान तो उड्डाणपूल रिकामा करावा. तेथे लोकांना चालण्यासाठी फूटपाथ नाही. सर्व भाजीमंडईतील हातगाडया स.नं. १ मध्ये बसू दया.

**मा.मंदाताई आल्हाट –** लोकांना सर्व सोईसुविधा पुरविण्याबाबत लक्ष दिले पाहिजे.

**मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर, सभापती –** अतिक्रमण विषयक सर्व निकाली होत नाही तोपर्यंत पुढची मिटींग होणार नाही.

**मा.अजित गव्हाणे –** काय अडचण आहे पार्कींगला जागा करण्याचे? आळंदी रोडचे पोलीस व आम्हाला एकत्र बसविले पाहिजे. मागील जागा आहे ती पार्कींगसाठी केली पाहिजे. सिक्युरीटी व्यवस्था पार्कींगसाठी केली पाहिजे. नेमके कुठे पार्कींग करायचे ते पाहिले पाहिजे. दोन,तीन मजले पार्कींग केले तर बरे होईल.

**मा.अनुराधा गोफणे –** क प्रभागामध्ये असताना याबाबत पत्र दिले होते. मंडईमध्ये कसे पार्कींग आहे, तसे आपलेकडे पार्कींगसाठी केली पाहिजे

**मा.अजित गव्हाणे –** बजेटमध्ये दुमजली पार्कींग करणेसाठी तरतूद केली पाहिजे.

**मा.जीवन गायकवाड (कार्य.अभियंता-स्थापत्य) –** येत्या १० तारखेपर्यंत मिटींग घेणार आहेत. त्या मिटींगमध्ये प्रत्येक प्रभागाचा आढावा घेणार आहे. तरतूद होणार आहे. मिटींगमध्ये या सर्व विषयावर बोलणार आहे.

**मा.अजित गव्हाणे –** तुम्ही पोलीसांना पत्र दया. आजच पत्र देणे. मा.आयुक्त साहेब यांना सुध्दा पत्र देण्यात यावे. सर्व नगरसेवक यांना पत्र देण्यात यावे.

**मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर, सभापती -** मा.आयुक्त साहेब यांना आजच पत्र दया.

**मा.अजित गव्हाणे –** आपले येथे सगळीकडे ट्राफिकचा खूप प्रोब्लेम आहे. त्यामुळे पार्कींगसाठी कुठले स्पॉट आहे, पार्कींगसाठी किती जागा असावी हे पाहिले पाहिजे. या सर्व गोष्टी मिटींगमध्ये मा.आयुक्त साहेब, डी.सी.पी साहेब यांचेबरोबर सन्मा. सदस्य असले पाहिजे. स्थापत्य विभागाचे गायकवाड साहेब व शिनकर मॅडम यांनी पार्कींगसाठी प्लॅनिंग करावे. चर्चा करावी. जागा कुठे आहे ते बघून घ्यावे. ही काळाची गरज आहे. प्रत्येक चौकामध्ये सिग्नल असले पाहिजे. चांदणी चौकामध्ये ब्लॉक नाही.

**मा.जीवन गायकवाड (कार्य.अभियंता-स्थापत्य) –** वनवेसाठी प्रस्ताव ठेवला होता. शाळेच्या मुलांची गर्दी असते. तिथे P1, P2 करायचे चालले होते. दोन तीन वेळा भेटलो होतो. परवा मिटींग आहे त्यावेळी मी बोलणार आहे. सध्या कार्पोरेशनचे नाटयगृह, भाजीमंडई ही दोन ठिकाण डोळयासमोर आहे. पीसीएमटी चौक, करसंकलन ऑफीस समोर हे एक ठिकाण आहे.

**मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर, सभापती -** च-होली येथील पोलीस चौकीसमोर प्लॅनिंग करा. पाच गुंठे जागा शिल्लक आहे. तीन मजली पार्कींग करा. कारण तिथे आता आपण शिल्प बनवत आहे. प्रस्ताव आपण ठेवू शकतो.

**मा.शिनकर मॅडम (नगररचना) -** भोसरी येथील दफनभूमी, नाटयगृह, लांडेवाडी चौक हे ठिकाण आहे. भोसरीमध्ये एक, दोन जागा आहे.

**मा.अजित गव्हाणे –** पार्कींगसाठी दिघी, च-होली मध्ये प्लॅनिंग करु शकतो.

**मा.मंदाताई आल्हाट** – सन २०१५-१६ चे बजेटमध्ये काम दाखवि ले आहे. प्रत्यक्षात एकही काम होत नाही.

**मा.जीवन गायकवाड (कार्य.अभियंता-स्थापत्य) –** सध्या बजेट नाही. त्यामुळे काम नाही.

**मा.मंदाताई आल्हाट –** तुम्ही कामांना महत्व दिले पाहिजे. छोटी छोटी कामे करायला पाहिजे. पाऊस नसल्यावर आता कामे करण्यासाठी वेळ आहे.

**मा.जीवन गायकवाड (कार्य.अभियंता-स्थापत्य) –** दोन तीन महिन्यात कामे करण्यात येतील. छोटी छोटी कामांची मंजूरी करुन घेऊ.

**मा.चंद्रकांत वाळके -** कंटेनर कधी हलविण्यात येईल. तुमचे नियंत्रण काय आहे? त्यामुळे अपघाताची किती शक्यता आहे. पालिकेचे रोडचे काम चालू आहे. सध्या यात्रा चालू झाली आहे. आदर्शनगर, विजयनगर या ठिकाणी ड्रेनेज लाईन फुटली आहे. ड्रेनेज चार फूट आहे. एक कि.मी.मध्ये एकही चेंबर दिसत नाही. अंतर्गत रोड आहे. तेथे ममता स्वीट आहे. आठ दहा दिवस झाले आहेत. फक्त झाकन खोलून पाहिले की त्यानंतर एकही काम केले नाही हे लक्षात येईल. मी मा.आयुक्त साहेबांना बोलणार आहे. वॉलकंपाऊंड पडले आहे. अनाधिकृत बांधकामामुळे त्यांनी अधिकृत भिंत पाडली. आम्हाला न विचारता लोकांची बेकायदेशीर कामे केल्यामुळे नगरसेवकांना काही किंमत नाही. दोन दिवसात कारवाई झाली नाही तर मा.आयुक्त साहेब यांचेकडे मांडी घालून बसणार आहे. २५० कुटूंब यापासून बाधीत होत आहे.

**मा.वाघमारे (कार्य.अभियंता-स्थापत्य)** – नंतर मी काम बंद केले आहे. विभागीय आयुक्तांकडे सगळे गेले आहेत.

**मा.चंद्रकांत वाळके –** मी जवळपास १५ कामे सांगितली आहेत. ती कामे चालू करा. दिघीच्या कामाची यादी दाखविली आहे. आम्हाला तीच तीच परिस्थितीचे बोलावे लागते. कामचेकडून काही चूकत असेल तर सांगा. चार दिवस झाले तुम्ही एक पण काम केले नाही. ठरावीक तारीख दया. छोटी छोटी कामे सांगितली आहेत. मोठी कामे तर करीतच नाही. असे वाटते तुम्हाला कुणाचा तरी दबाव आहे.

**मा.जीवन गायकवाड (कार्य.अभियंता-स्थापत्य) -** काही कामे चालू केलेली आहे. मी स्वत: लक्ष घालतो व कामे करुन घेतो.

**मा.चंद्रकांत वाळके –** तुम्ही फार दबावाखाली काम करीत आहात. तुम्ही नगरसेवकांची काही कामे करीत नाही. त्यामुळे खूप मानसिक त्रास होत आहे. फार अति झाले आहे. चुकीची कामे दिली तर करु नका. आम्ही सांगितलेली कामे स्वत: करीत नाही. प्रत्येक वॉर्डमध्ये काय चालले आहे. तुम्ही आमचेकडून माहिती घेणार व कामे करणार, हे काय चालले आहे. खेळ चालला आहे. अशी कामे करुन जमते का? आम्हाला त्या मार्गाला जायचे नाही. किती सहन करायचे. लोकांना आम्ही काय सांगायचे. बघा कशा परिस्थितीत तुम्ही काम करीत आहात. मी सात, आठ महिन्यात

का आठ दिवसात उभे राहतो. किरकोळ गोष्टी मी करीत नाही. चालू कामे व्यवस्थित करावी अशी अपेक्षा करतो.धन्यवाद.

**मा.सुरेखा गव्हाणे –** माझे वॉर्डमध्ये प्रत्येक कामावर दबाव येत आहे. दिव्याचे एकत्र काम चालू केले आहे. जे काम केले आहे ते अर्धवट आहे

**मा.जीवन गायकवाड (कार्य.अभियंता-स्थापत्य) -** जागेवर जाऊन अर्धवट कामे आपण करुन घेऊ. मी पण स्वत: येतो.

**मा.सुरेखा गव्हाणे –** दुसरीकडे सांगितल्यामुळे लोकांची कामे करतात.

**मा.विश्वनाथ लांडे –** काय अडचण आहे तुम्हाला? कामे का नाही होत?

**मा.जीवन गायकवाड (कार्य.अभियंता-स्थापत्य) -** जे जे स्पॉट दिले आहे त्या ठिकाणी मी स्वत: येतो व कामे करुन घेतो.

**मा.सुरेखा गव्हाणे –** ब्लॉक बसवून देत नाही.

**मा.विश्वनाथ लांडे –** आता पर्यंत किती ब्लॉक बसविले सांगा.

**मा.व्ही.सी.काळे (उप अभियंता स्थापत्य) –** एकच ब्लॉक बसवि ला आहे. कलरच्या ब्लॉकला तीनशे रुपयाचा खर्च येतो.

**मा.विश्वनाथ लांडे –** मा.योगेश बहल व सुलभाताई उबाळे यांचेकडे कसले ब्लॉक बसविले आहेत ते बघा. रंगीत ब्लॉक बसविले आहेत.

**मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर, सभापती –** इ प्रभागात सगळीकडे रंगीत बाकडे व रंगीत ब्लॉक सगळीकडे देण्यात यावे.

**मा.मंदाताई आल्हाट –** आळंदी यात्रा सुरु होत आहे. आळंदी रोड व शाळेच्या बाजूला शौचालयाची जागा सांगितली आहे तेथे फायबरच्या शौचालयाची व्यवस्था करावी. तसेच पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात यावी.

**मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर, सभापती -** सर्वांचे मिटींगमधील हे प्रश्न मार्गी लागले पाहिजे. परत मिटींगला विषय घ्यायचे नाही अशी कामे करा.

**मा.व्ही.सी.काळे (उप अभियंता स्थापत्य) -** दोन पत्र दिली आहेत. रस्त्यावरील खड्डे भरले आहेत. ठिकठिकाणी पाणी साचले आहे तेथील रस्त्याचे पाणी काढून रस्त्याचे काम केले आहे. एकूण १५ ठिकाण आहे.

**मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर, सभापती** – ठेकेदार मंत्राणीला बोलवणे. सहा महिने झाले ठराव करुन त्योनी अजून काम केले नाही.

**मा.व्ही.सी.काळे (उप अभियंता स्थापत्य) -** मार्केटप्रमाणे जे असेल तसे फायनल केले जाईल.

**मा.संजय निवृत्ती आहेर-स्विकृत सदस्य –** क्रिडा विभागाने अजून काम केले नाही. इंद्रायणीनगरमधील बॅडमिंटन हॉल येथे मोठा लिकेज प्रोब्लम आहे. तेथे पक्षी खूप घाण करतात. इंद्रायणीनगरमधील बॅडमिंटन हॉल येथे नेट मिळण्यासाठी वेळोवेळी पत्रव्यवहार केलेला आहे. अजूनपर्यंत चांगल्या नेट दिलेल्या नाहीत. तुटक्याच नेट आहेत.

**मा.फुगे एन.जे. (प्र.क्रिडा पर्यवेक्षक) -** इंद्रायणीनगरमधील बॅडमिंटन हॉल येथील लिकेज प्रोब्लम सॉल झालेला आहे. साहित्य खरेदी ही भांडार विभागाकडून होत असते. भांडार विभागाकडून चांगल्या नेट मिळाल्यावर देण्यात येतील.

**मा.अजित गव्हाणे –** क्रिडा विभागाकडे साहित्य मिळण्यासाठी मागणी करा. लिकेजचे काम स्थापत्य विभागाने केले पाहिजे.

**मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर, सभापती –** आळंदी यात्रे करीकरीता साफ सफाई करणारे कर्मचारी वाढविणे. आता आमचेकडे सोसायट्यांची संख्या वाढणार आहे. त्यामुळे आम्हाला कच-याची एक गाडी वाढविली पाहिजे.

**मा. रविंद्र भोकरे (सहा.आरोग्याधिकारी) –** आळंदी यात्रेकरीता वेगळे पथक तयार करणार आहे. आजच या संदर्भात मिटींग झाली. साफसफाई करणारे कर्मचारी कमी आहेत त्याबाबत चर्चा झाली. आरोग्याचे किती कर्मचारी साफसफाईचे काम करतात याचा मी आढावा घेतो.

**मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर, सभापती –** आरोग्य विभागाकडून साफसफाई विषयक कामे तुम्ही सांगितली पाहिजे. तीन वर्षे झाली कर्मचारी वाढविण्या ऐवजी उलट कमी करण्यात आलेले आहे. ही गोष्ट चुकीची आहे. आमचे भौगोलिक क्षेत्र मोठे आहे. चार भोसरी तेंव्हा एक च-होली आहे. आमचेकडे कर्मचा-यांची वर्गवारी केली पाहिजे. जास्त कर्मचारी दिले पाहिजे. आमचेकडे साफसफाई करणारे कर्मचारी कमी का आहेत? इ प्रभागात भोसरी आहे. मला कर्मचारी वाढवून पाहिजे. मला काही तरी ठोस उत्तर पाहिजे. आमचेकडे औषध फवारणी होत नाही. धुराची गाडी कधीच येतनाही. मच्छर खूप झाले आहेत. नागरीक आम्हाला बोलतात. आम्हाला नागरीकांना फेस करावे लागते. सर्व कामे व्यवस्थित केली पाहिजे. उद्यान विभागाने ज्या झाडांच्या फांदया वाढलेल्या आहेत. त्यामुळे लाईटच्या खांबांना लागून लाईट जाते. त्यामुळे फांदया कापून घ्या.

**मा.अनुराधा गोफणे** - नागरी सुविधा केंद्र यांचेकडे २०१४-१५ पासूनची विधवा महिलांना मिळणा-या अनुदानाची यादी तयार आहे. अजून त्यांना काही मिळाले नाही

**मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर, सभापती –** महिलांना शिलाई मशिन, मुलांना सायकल अजून मिळाल्या नाही. सायकलीला गंज लागलेला आहे.

**मा.अनुराधा गोफणे** - समुह संघटक यांना आपल्या प्रभागात बसण्यासाठी त्वरीत जागा दया. त्यांना बसण्यासाठी टेबल आणि खुर्च्या दयाव्यात. दोन प्रभागात तशी बसण्याची व्यवस्था त्यांची केलेली आहे.

**मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर, सभापती –** दोन माणसे ताबडतोब इ प्रभागात बसली पाहिजे. खांडगेकर साहेब यांना मशीन आणि सायकल देण्यासाठी सांगण्यात यावे. आपल्या शहराचा पाणीपुरवठा ३ तारखेला बंद आहे. त्यामुळे काय व्यवस्था करण्यात येईल.

**मा.कोंडे (उपअभियंता -पाणीपुरवठा) –** टँकरने पाणीपुरवठा करण्यात येईल. ७ तारखेलाही पाणीपुरवठा करावा लागेल.

**मा.क्षेत्रीय अधिकारी –** इ क्षेत्रीय कार्यालयाच्या अंतर्गत जे वॉर्ड आहेत त्यांचे क्षेत्रीय सभेचे आयोजन करावयाचे असल्याने सन्मा.सदस्य यांनी आपला वेळ व तारीख निश्चीत करुन तसे पत्र देण्यात यावे. त्यानंतर सभेचे नियोजन करणे सोईचे होईल.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.